# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

<u>प्रसिद्धी पत्रक                                        ता. १९ ऑक्टोबर २०१९</u>

# धंतोली रेल्वे पूल ते बैधनाथ चौक वाहतूक बंद

## मनपा आयुक्तांचे आदेश : सीमेंट रस्ता बांधकामामुळे डाव्या बाजुने दुतर्फा वाहतूक

**नागपूर, ता. १९ :** नागपूर महानगरपालिकेद्वारे शासकीय अनुदानांतर्गत धंतोली रेल्वे अंडर ब्रिज ते बैधनाथ चौकापर्यंत उजव्या बाजूने डांबरीकरण करण्याचे प्रस्तावित असून सदर कामाकरीता या मार्गावरील उजवीकडील मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्याचे आदेश महानगरपालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले आहेत.

नागपूर महानगरपालिकेद्वारे शासकीय अनुदानांतर्गत धंतोली रेल्वे पूलाखालील डांबरी रस्त्याचे डांबरीकरण करण्यात येणार आहे. त्याकरीता २६ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबरपर्यंत या मार्गावरील उजव्या बाजूची वाहतूक बंद राहील. या मार्गावरील वाहतूक डाव्या बाजुने दुतर्फा राहील तर इतर वाहतूक अंतर्गत रस्त्यावरून वळविण्याचे आदेश महानगरपालिका आयुक्त

अभिजीत बांगर यांनी दिले आहेत. सदरबाबतचे लेखी आदेश नुकतेच निर्गमित करण्यात आले आहेत.